**औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस**

| पोलीस अधिक्षक, कार्यालय | **प्रेसनोट** | दिनांक ०४/०१/२०१७ |
|---|---|---|

**प्रति,**
**सर्व सन्माननीय,**
**...............**

याव्दारे आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र पोलीस स्थापना दिनाच्या अनुषंगाने औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस दलाचे वतीने पोलीस अधिक्षक कार्यालया शेजारी, कैलास शिल्प सांस्कृतिक सभागृह येथे दिनांक ०२/०१/२०१७ ते ०५/०१/२०१७ रोजी पावेतो प्रदर्शन आयोजित केले आहे. ज्यात औरंगाबाद ग्रामीण पोलीस दल, औरंगाबाद पोलीस आयुक्तालय, शासकीय फॉरेन्सीक महाविद्यालय, औरंगाबाद यांचे स्टॉल लावण्यात आलेले आहेत. ज्यात सायबर सेल, वाहतूक शाखा, महिला पथक, फॉरेन्सीक, आर्थिक गुन्हा शाखा, पोलीस मुख्यालय येथील शस्त्रगार शाखा इत्यादींचा समावेश आहे. प्रदर्शनात पोलीस दलात वापरण्यात येणारी आधुनिक शस्त्रास्त्रे व आधुनिक तंत्रज्ञाना बाबतची इथंभुत माहिती, देण्यात येत आहे.

सदरचे प्रदर्शन सकाळी ०९०० ते ०५०० वाजेपर्यंत सर्वांसाठी खुले असून दिनांक ०२/०१/२०१७ रोजी पासून आजपावेतो सुमारे दोन ते अडीच हजार शालेय विद्यार्थी, शिक्षक, पालक तसेच सर्वसामान्य नागरिकांनी प्रदर्शनास भरभरून प्रतिसाद दिलेला आहे. प्रदर्शन पाहण्यासाठी फुलंब्री, करमाड, चिकलठाणा, पडेगांव, औरंगाबाद शहर व परिसरातून शालेय विद्यार्थी व नागरिक मोठया प्रमाणावर येत आहेत. आजपावेतो सुमारे १९ शाळांच्या विद्यार्थ्यांनी प्रदर्शनास भेट देवून आनंद व्यक्त केला आहे. सदरचे प्रदर्शन उदईक दिनांक ०५/०१/२०१७ रोजी ०५०० वाजेपावेतो सर्वांसाठी खुले राहणार असून जास्तीत जास्त नागरिकांनी, विद्यार्थ्यांनी सदरचे प्रदर्शन पहावे व पोलीस दलाचे कामकाज कशा पध्दतीने चालते याबाबत माहिती घ्यावी. असे आवाहन औरंगाबाद ग्रामीण जिल्हा पोलीस दलातर्फे करण्यात येत आहे.

**पोलीस अधीक्षक**
**औरंगाबाद ग्रामीण यांच्या करिता**